**रे.के.नं. १८/२००७**
**नि.क्र. ४१/क**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | विकास केशव पाटील |
| वय | - | ५७ वर्षे |
| व्यवसाय | - | नोकरी, |
| राहणार | - | विनायक काटे आळी, उरण, ता. उरण |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पवार यांच्याद्वारे**

१. घटनेच्यावेळी मी उरण येथील तहसिल कार्यालयात शिपाई पदावर कार्यरत होतो. घटनेची तारीख मला आठवत नाही. ती घटना जे.ए.पीटी येथे घडली होती. तेथे तेल पकडले होते. त्यावेळी तहसिलदार सुप्रिया करमळकर, एस.आय दशरथ भोईर व आणखी पाच ते सहा जणांसोबत आम्ही जीपने तेथे गेलो होतो. आम्ही तेथे जाण्यासाठी संध्याकाळी ७.०० ते ७.३० वाजताच्या सुमारास निघालो होतो. तेथे आम्ही रात्री ८.०० वाजताच्या सुमारास पोहोचलो. तेथे तहसिलदार मॅडम यांनी दोन ते तीन व्यक्तींकडून तेल पकडले. त्यातील एक व्यक्ती जैनभाई व आणखी एक व्यक्ती मुस्लीम समाजाचा होता. त्यांनी बॅरल मध्ये असलेले डिझेल व केमिकल पकडले होते. ते बॅरल लोखंडी होते व १० ते १५ नग होते. तो माल किती रक्कमेचा होता ते मला आठवत नाही. त्या व्यक्तींकडे डिझेल व रसायन बाळगण्याचा परवाना नव्हता. त्या वस्तू तहसिलदार यांनी जमा करुन घेऊन गुन्हा दाखल केला होता.

**सदर प्रकरण हे आरोपी विरुद्ध फौ.प्र.सं. कलम २९९ प्रमाणे चालविण्यात येत असल्याने आरोपी तर्फे उलट तपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत
सही/-

**उरण,** **(एस.पी. वानखडे )**
**दिनांक – १२/११/२०२५** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.२ उरण**